प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

फेब्रुवारी 12, 2016

**दि कच्छ मर्कंटाईल सहकारी बँक लि., रापार, जिल्हा कच्छ (गुजराथ) हयांच्यावर आरबीआयकडून आर्थिक दंड जारी**

बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, 1949 (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) च्या, कलम 46(4) सह वाचित कलम 47 अ (1)(ब) खालील तरतुदीनुसार, मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने, दि कच्छ मर्कंटाईल सहकारी बँक लि.; रापार, जिल्हा कच्छ, (गुजराथ) हयांना पुढील उल्लंघनांसाठी रु.5.00 लाख (रु.पाच लाख फक्त) आर्थिक दंड ठोठावला आहे.

(1) बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, 1949 (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) च्या कलम 36(1) खाली रिझर्व बँकेने दिलेल्या सूचनांचे पालन न करणे.

(2) केवायसी नॉर्म्सचे मोठ्या प्रमाणावर पालन न करणे.

(3) शंकास्पद व्यवहार ओळखण्यासाठी कोणतीही प्रणाली/व्यवस्था ठेवली नसणे.

रिझर्व बँकेने, हया बँकेला, एक कारणे दाखवा नोटिस दिली होती. त्या नोटिसीला हया बँकेने लेखी उत्तर सादर केले होते. हया प्रकरणातील सत्य गोष्टी व बँकेचे उत्तर हयावर विचार करुन, आरबीआयने निष्कर्ष काढला की वरील उल्लंघने निश्चित झाली असून, त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/1916**